# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

## निविदा सूचना

जा.क्रं.नांवाशमनपा/विद्युत/ई - निविदा/ 10392 /२०२५-२६ दिनांक : 06/11/2025

आयुक्त, नांदेड ल कामाची कोरी निविदा उप अभियंता (विद्युत) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांच्या कार्यालयात सकाळी ११.०० ते दुपारी ०४.०० वाजे पर्यंत दिनांक 08/11 / २०२५ ते दिनांक 14 11 / २०२५ या कालावधीत सुटीचे दिवस वगळुन को-या निविदेची किंमत भरलेला अर्ज सादर केल्या नंतर देण्यात येतील विहित मुदतीनंतर निविदेची किंमत भरलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही. मोहरबंद निविदा स्विकारण्याची अंतिम दिनांक 17/ 11 / २०२५ रोजी दुपारी १४.०० वाजे पर्यंत राहील. शक्य झाल्यास प्राप्त निविदा वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड. हे खाली दर्शविण्यात आलेल्या कामाकरिता ब-१ नमुन्यात मोहरबंद निविदा मागवित आहेत. खालीत्याच दिवशी उघडण्यात येतील. निविदेच्या अटी व शर्ती कार्यालयात व नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड च्या नोटीस बोर्डवर पाहावयास मिळतील.

| अक्रं | कामाचे नांव | अंदाजपत्रक रक्कम रु. | इसारा रक्कम रु. १ % | कोऱ्या निविदा किंमत रु. | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | नांदेडवाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड हद्दीतील प्रभाग क्र. १५ (क) येथिल विविध धार्मिक स्थळाच्या ठिकाणी नविन पोल व LED Lights बसविणे बाबत | २२९९०४.०० | २२९९.०० | २०० + वस्तु सेवा कर | सहा महिने |

निविदाचे अटी व शर्ती

१. कंत्राटदाराने खालील प्रमाणे कागदपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

०१. महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभाग/मुख्य विद्युत निरीक्षक मुंबई यांचेकडील विद्युत ठेकेदाराची चालू योग्य त्या वर्गाची अनुज्ञाप्ती प्रमाणपत्राची सत्यप्रत सादर करणे आवश्यक आहे.

०२. पॅन कार्ड व मागील तिन वर्षाचे आयकर भरणा केल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

०३. जी.एस.टी.नोंदणी प्रमाणपत्र.

०४. विद्युत व्यवस्थेचे काम केल्याचे अनुभव प्रमाणपत्र.

०५. ई.पी.एफ. व ई.एस.आय.सी. नोंदणी प्रमाणपत्र.

०६. महाराष्ट दुकाने व आस्थापना अधिनियम २०१८ अन्वये नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

०७. सा.बा.विभागाचा शासन निर्णय क्रं सीएटी २०१८/प्रक्रं १२७/इमार दि.२८/११/२०१८ मधील शुध्दीपत्रक कंत्राटदाराने रु.१००/- च्या बॉन्ड पेपरवर सादर केलेल्या कागदपत्र खरी,बरोबर व पूर्ण आहेत,त्यामध्ये कोणत्याही त्रुटी, चुका नाहीत म्हणून शपथपत्र सादर करणे आवश्यक आहे.

०८.अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराच्या निविदा भरल्यास सा.बा.विभागाचा शासन निर्णय क्रं सीएटी/२०१७/प्रक्रं८/इमार२ दि.२९/९/२०१८ मधील शुध्दीपत्रक दिनांक २६ नोव्हेंबर २०१८ नुसार लिफाफा क्रं १ व २ उघडल्यानंतर प्रथम न्युनतम देकार सादर करणाऱ्या एल-१ निविदाधारकाने Additional performance security deposit आठ दिवसाच्या आत शहर अभियंता यांच्याकडे जमा करावे.

०९. सा.बा.विभागाचा शासन निर्णय क्रं संकीर्ण २०२१/प्र.क्रं.५४/इमारती २ दि.०७/१२/२०२३ मधील परीशिष्ट "अ" तरतुदीनुसार सदर कामासाठी मागील पाच वर्षाचे सर्व कामांचे Work Done प्रमाणपत्र व वार्षिक उलाढाल (Turnover) दर्शविणारे सनदी लेखापालाने प्रमाणित केलेले कागदपत्रे तसेच परीशिष्ट "ब" तरतुदीनुसार उपलब्ध मनुष्यबळ लागणार आहे त्यांचा तपशील संगणक प्रणालीमध्ये आनलाईन पद्धतीत विहीत नमुन्यात सादर करणे आवश्यक आहे.

२. कोणत्याही कारणाशिवाय निविदा नाकारण्याचे अधिकार मा. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड यांनी राखून ठेवलेला आहे.

३. सदर कामी विमा काढणे कंत्राटदारास बंधनकारक आहे.

४. या कामासाठी कंत्राटदारांनी काम पूर्ण झाल्यावर एक वर्षाची वॉरंटी द्यावे लागेल व वॉरंटी काळात नि:शुल्क दुरुस्ती करुन द्यावे लागेल.

स्वा.
शहर अभियंता,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

प्रतिलिपी

१. नोटीस बोर्ड, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

२. ई टेंडरिंग विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

शहर अभियंता,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड